महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
प्रकाशगड, ५ वा मजला, स्टेशन रोड, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
दु.क्र.(ऑ.)२६४७४२११, २६४७२१३१ वि.क्र.३५०७ (वै.)२६४७४७५१ फॅक्स : ०२२.२६४७६२३३, २६४७२३१८

क्र.मुअ (वा) / लेखा/ इडी-७/ No 18120 दिनांक : 9 JUN 2009

परिपत्रक-101

**विषय :-** विदर्भ व मराठवाडा विभागातील औद्योगिक ग्राहकांना विद्युत शुल्क माफी / सुट.

**संदर्भ :-** १) शासन अधिसुचना क्र. ईएलडी-२००९ /प्र.क्र. ६ / ऊर्जा-१ दि.२६.०५.२००९.
२) शासन अधिसुचना क्र. ईएलडी-२००४ /प्र.क्र. २१३ / ऊर्जा-१ दि.०७.०७.२००४.
(सर्वसाधारण परिपत्रक (वा) क्र. ३९३.)

---

उपरोक्त विषयाच्या, संदर्भाधीन शासन अधिसुचने नुसार (प्रत सोबत जोडली आहे) राज्यातील विदर्भ व मराठवाडा विभागातील औद्योगिक उपक्रमांकाकडून, औद्योगिक कारणासाठी वापरण्यात येत असलेल्या जागेच्या बाबतीत, त्या ठिकाणी वापरलेल्या विजेवर, सदर अधिनियमाच्या अनुसुचितील भाग "फ" आणि भाग "ग" च्या स्तंभ (ब) खाली देय असलेले संपूर्ण विद्युत शुल्क भरण्यापासून दिनांक ०१.०४.२००९ पासून पूढील पाच वर्षा करीता म्हणजेच दिनांक ३१.०३.२०१४ पर्यंत माफी देण्यात आली आहे.

आपणास विनंती आहे की, उपरोक्त अधिसूचनेतील, विद्युत शुल्क माफी / सुट संबंधीत कालावधी बदलाची नोंद घेऊन अधिसुचनेतील आदेशाप्रमाणे पुर्वलक्षी प्रभावाने (दिनांक ०१.०४.२००९ ) पुढील कार्यवाही करावी. तदवत् एप्रिल २००९ पासुन ग्राहकांच्या वीज बिलातुन वसुल केलेल्या विद्युत शुल्काच्या रकमेच्या परतावा समायोजने करिताचा निर्णय, शासनाच्या मंजुरी नंतर आपणांस पुढील कार्यवाहीसाठी कळविण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

तथापी, अशा सर्व ग्राहकांच्या वीज बिलावर, संबंधीत कालावधीची नोंद घेऊन, कालावधी समाप्ती नंतर विद्युत शुल्क आकारणी करण्यात यावी.

Sd/- 9/06/09

**सोबत :-** सहपत्र वरीलप्रमाणे.

**मुख्य अभियंता (वाणिज्य)**

प्रत सविनय सादर - (माहितीस्तव)
१) मा. व्यवस्थापकीय संचालक (महावितरण), मुंबई.
२) मा. संचालक (वित्त), महावितरण, मुंबई.
३) मा. संचालक (संचलन), महावितरण, मुंबई.
४)प्रादेशिक कार्यकारी संचालक - १, म.रा.वि.वि.कं.मर्यादित, कल्याण /-२, म.रा.वि.वि.कं.मर्यादित, पुणे /-३, म.रा.वि.वि.कं.मर्यादित नागपूर.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग चार-ब

वर्ष १, अंक २७] बुधवार, मे २७, २००९/ज्येष्ठ ६, शके १९३१ [पृष्ठे ४

किंमत : रुपये १५.००

## असाधारण क्रमांक ८८

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

## उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २६ मे २००९

### अधिसूचना

**मुंबई वीज शुल्क अधिनियम, १९५८.**

क्रमांक इएलडी. २००९/प्र. क्र. ६/ऊर्जा १.–ज्या अर्थी शासन अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक इएलडी. २००४/सीआर-२१३/एनआरजी-१, दिनांक ७ जुलै २००४ याद्वारे महाराष्ट्र शासनाने राज्यातील विदर्भ आणि मराठवाडा विभागातील औद्योगिक उपक्रमांकडून वापरण्यात येत असलेल्या जागेच्या बाबतीत त्या ठिकाणी वापरलेल्या वीजेवर मुंबई वीज शुल्क अधिनियम, १९५८ (१९५८ चा मुंबई ४०) च्या अनुसूचीतील भाग " च " आणि भाग " छ " च्या खंड (ख) खाली देय असलेले संपूर्ण वीज शुल्क भरण्यापासून पुढे विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे सूट देत आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त सूट देण्याचा पाच वर्षांचा कालावधी सार्वजनिक हिताच्या दृष्टीने वाढविणे आवश्यक आहे ;

त्याअर्थी आता, मुंबई वीज शुल्क अधिनियम, १९५८ (१९५८ चा मुंबई ४०) यांच्या कलम ५क द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे भूतलक्षी प्रभावाने, म्हणजेच दिनांक १ एप्रिल २००९ पासून राज्यात विदर्भ व मराठवाडा विभागातील औद्योगिक

उपक्रमांकडून वापरण्यात येत असलेल्या जागेच्या बाबतीत त्या ठिकाणी वापरलेल्या वीजेवर, पाच वर्षांसाठी उक्त अधिनियमाच्या अनुसूचीतील भाग " च " खाली आणि भाग " छ " च्या खंड (ख) खाली देय असलेले संपूर्ण वीज शुल्क भरण्यापासून सूट देत आहे ;

आणि या प्रयोजनार्थ, उक्त अधिसूचनेत पुढीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे :–

(अ) परिच्छेद (१) मधील,–

(एक) खंड (अ) मध्ये, " दिनांक १ एप्रिल २००४ रोजी " या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि " ५ वर्षांच्या कालावधीकरिता " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

" दिनांक १ एप्रिल २००४ रोजी किंवा त्यानंतर परंतु दिनांक ३१ मार्च २०१४ पूर्वी कोणत्याही दिवशी वस्तूंच्या निर्मितीस किंवा उत्पादनास प्रथम सुरुवात केली असेल अशा कोणत्याही नवीन औद्योगिक उपक्रमाच्या बाबतीत, अशा औद्योगिक उपक्रमाने वस्तूंच्या निर्मितीस किंवा उत्पादनास सुरुवात केली असेल अशा दिनांकापासून दिनांक ३१ मार्च २०१४ पर्यंतच्या कालावधीकरिता " ;

(दोन) खंड (ब) मध्ये, " दिनांक १ एप्रिल २००४ पासून " या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि " ५ वर्षांच्या कालावधीकरिता " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी " दिनांक ३१ मार्च २०१४ पर्यंतच्या कालावधीकरिता " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ब) परिच्छेद (दोन) मध्ये,–

(एक) खंड (अ) मध्ये, " दिनांक १ एप्रिल २००४ रोजी " या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि " ८ वर्षांच्या कालावधीकरिता " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी पुढील मजकुर दाखल करण्यात येईल ;

" दिनांक १ एप्रिल २००४ रोजी किंवा त्यानंतर परंतु दिनांक ३१ मार्च २०१४ पुर्वी कोणत्याही वस्तूंच्या निर्मितीस किंवा उत्पादनास प्रथम सुरुवात केली असेल अशा कोणत्याही नवीन औद्योगिक उपक्रमांच्या बाबतीत, अशा औद्योगिक उपक्रमाने वस्तूंच्या निर्मितीस किंवा उपक्रमास सुरुवात केली असेल अशा दिनांका पासून दिनांक ३१ मार्च २०१४ पर्यंतच्या कालावधीकरिता " ;

(दोन) खंड (ब) मध्ये, " दिनांक १ एप्रिल २००४ पासून " या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि " ८ वर्षांच्या कालावधीकरिता " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी, " दिनांक ३१ मार्च २०१४ पर्यंतच्या कालावधीकरिता " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**मोहन पांढरकागे,**
शासनाचे उप सचिव.

## INDUSTRIES, ENERGY AND LABOUR DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 26th May 2009

*NOTIFICATION*

BOMBAY ELECTRICITY DUTY ACT, 1958.

No. ELD. 2009/C.R.-6/NRG. 1.—Whereas by Government Notification, Industries, Energy and Labour Department, No. ELD. 2004/CR-213/NRG-1, dated the 7th July 2004, the Government of Maharashtra has exempted the consumption of energy in respect of premises used for industrial undertakings in Vidarbha and Marathwada regions of the State, from payment of whole of the electricity duty payable under Part "F " and clause (*b*) of Part " G " of the Schedule to the Bombay Electricity Duty Act, 1958 (Bom. XL of 1958) ;

And whereas, it is necessary in the public interest to extend the period of said exemption for a period of five years ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by section 5A of the Bombay Electricity Duty Act, 1958 (Bom. XL of 1958), the Government of Maharashtra hereby, with retrospective effect, that is to say, with effect from the 1st April 2009, exempts the consumption of energy in respect of the premises used for industrial undertakings in Vidarbha and Marathwada regions of the State from payment of the whole of the electricity duty payable under Part " F " and clause (*b*) of Part " G " of the Schedule to the said Act for a period of five years ; and for that purpose amends the said Notification as follows, namely :—

In the said Notification,–

(*a*) in paragraph (1),–

(*i*) in clause (*a*), for the portion beginning with the figures, letters and word " 1st April 2004 " and ending with the words " to manufacture or produce article ", the following shall be substituted namely :—

" 1st April 2004 but before the 31st March 2014, for a period beginning from the date on which such industrial undertaking begins to manufactures or produce articles upto 31st March 2014";

(*ii*) in clause (*b*), for words, letters and figures " for a period of five years commencing on 1st April 2004 and ending on 31st March 2009 ", the words, figures and letters " for a period upto 31st March 2014 " shall be substituted,

(*b*) in paragraph (II),–

(*i*) in clause (*a*), for the portion beginning with the figures, letters and word " 1st April 2004 " and ending with the words " to manufacture or produce article ", the following shall be substituted, namely :–

" 1st April 2004 but before the 31st March 2014, for a period beginning from the date on which such industrial undertaking begins to manufactureor produce articles, upto 31st March 2014" ;

(*ii*) in clause (*b*), for the words, figures and letters " for a period of 8 years commencing on the 1st April 2004 and ending on 31st March 2012", the words, figures and letters " for a period upto 31st March 2014 " shall be substituted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

MOHAN PANDHARKAME,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004.